N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** आष्टी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0163 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/04/2023 04:07

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 24/04/2023
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 24/04/2023
**Time From (वेळेपासून):** 15:25 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 25/04/2023 **Time (वेळ):** 03:03 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 006
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/04/2023 03:03 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 05 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** लघुपाठबंधारे विभाग आष्टी ,आष्टी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अमोल नाथा लोखंडे
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1991
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | धामनगाव ,आष्टी ,आष्टी ,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | धामनगाव ,आष्टी ,आष्टी ,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9853527777

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कुंदन आशोक गायकवाड | | | 1. कल्पना नगर कळंब ,कळंब , कळंब ,उस्मानाबाद,महाराष्ट्र, भारत |
| 2 | पोपट श्रीधर गरुड | | | 1. दादेगाव ,आष्टी ,आष्टी ,बीड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 3880 रुपये | 3,880.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,880.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

ला.प्र.वि.कार्यालय बीड

दिनांक:- 24/04/2023.

मी अमोल नाथा लोखंडे, वय-32 वर्ष, व्यवसाय-नौकरी, आरेखक-3, लघु पाटबंधारे उप विभाग, आष्टी ता.आष्टी जि.बीड रा.धामणगाव ता.आष्टी जि.बीड मो.क्र.9853527777

मी आज दिनांक 24/04/2023 रोजी श्री.शंकर शिंदे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांचे समक्ष शासकीय आय.टी.आय.चे बाजुस आष्टी येथे सुरक्षीत ठिकाणी पंचासमक्ष तक्रार दिली की, "मी प्रवास भत्ता मिळण्यासाठी प्रवास भत्ता देयके तयार करुन कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद मध्यम प्रकल्प विभाग, उस्मानाबाद येथे दाखल केले असुन सदरचे देयक मंजुर करण्यासाठी तसेच मंजुर देयकाचा चेक देण्यासाठी माझ्याकडे श्री.गायकवाड 2000/-रुपये व श्री.गरुड हे प्रवास भत्ता मंजुर देयकाच्या 20 टक्के रकमेची मागणी करीत आहेत." वगैरे मजुकराची तक्रार दिली.

श्री.शंकर शिंदे यांनी माझे तक्रारीचे अनुषंगाने आज दिनांक 24/04/2023 रोजी लोकसेवक श्री.गरुड हे माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यावरुन मला व पंच क्रमांक-1 श्री.वाघमारे यांना श्री.गरुड यांचेकडे लघु पाटबंधारे उप विभाग, आष्टी येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरले. श्री.शंकर शिंदे यांनी मला व पंचांना एकंदरीत सापळा कारवाई कशी असते याबाबत माहिती देऊन लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देऊन व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी मला व पंच क्रमांक 1 श्री.वाघमारे यांना लघु पाटबंधारे उप विभाग, आष्टी येथे श्री.गरुड यांचेकडे पाठवुन व्हाईस रेकॉर्डरचे मदतीने लाचमागणी पडताळणी केली असता, माझी व श्री.गरुड साहेब यांची लघु पाटबंधारे उप विभाग, आष्टी येथे भेट झाली. त्यावेळी माझेत व श्री.गरुड साहेब यांचेत चर्चा झाली. त्यावेळी श्री.गरुड हे मला म्हणाले की, श्री.गायकवाड यांनी प्रवास भत्ता देयकाचा चेक पैसे घेतल्याशिवाय देऊ नको असे सांगीतले आहे. त्यावर मी त्यांना श्री.गायकवाड काय म्हणतात ते ऐकु द्या असे म्हणुन श्री.गायकवाड यांना फोन करण्यास सांगीतला. त्यावर श्री.गरुड यांनी त्यांचे मोबाईल फोनवरुन श्री.गायकवाड यांना फोन करुन स्पिकर ऑन करुन बोलले असता, श्री.गायकवाड यांनी पैसे दिल्याशिवाय चेक देऊ नको असे म्हणुन प्रवासभत्ता देयकाचा चेक देण्यासाठी 2000/-रु. लाचेची मागणी केली. त्यानंतर श्री.गरुड यांनी प्रवास भत्ता देयकाचा चेक दाखवुन मंजुर देयक 19410/-रुपयाचे 20 टक्के प्रमाणे 3882/-रुपये लाचेची श्री.गायकवाड यांचेसाठी व स्वत:साठी मागणी करुन लाच रक्कम लागलीच स्वत: स्विकारण्याचे मान्य केले.

त्यावरुन श्री.शंकर शिंदे यांनी श्री.गरुड यांचे विरुध्द लागलीच लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असुन वेळे अभावी केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रीत पंचनामा करण्यात येणार असल्याचे सांगीतले. श्री.गरुड यांनी माझ्याकडे मंजुर देयक 19410/-रुपयाचे 20 टक्के प्रमाणे 3882/-रुपयाची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केल्याने, त्यांचेविरुध्द 3880/-रुपये लाचेचा सापळा अजमावण्याचे सर्वानुमते ठरले. श्री.शंकर शिंदे यांनी सापळा कारवाईसाठी अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवुन त्याबाबत मला व पंचांना माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. श्री.शंकर शिंदे यांनी मला व पंचांना नियोजित सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर मी सापळा कारवाईसाठी लागणारी आवश्यक लाच रक्कम 3880/-रुपये ज्यामध्ये 500/-रुपये दराच्या 7 नोटा, 200/-रुपये दराची एक नोट, 100/-रु.दराची एक नोट, 50/-रुपये दराची एक नोट व 10/-रुपये दराच्या 3 नोटा श्री.शंकर शिंदे यांचेकडे हजर केले. श्री.शंकर शिंदे यांनी लाचेच्या नोटांचे क्रमांक पंच क्रमांक 1 यांचे करवी नमुद करुन घेऊन लाच रकमेस अँथ्रासीन पावडर लावुन लाच रक्कम माझे पॅंटचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवुन मला लाच स्विकृतीनंतर गळ्यातील गमजा डोक्यास बांधावा असा इशारा नेमुन

दिला.
त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांचे सुचनेवरुन पोशि/राठोड यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे देऊन मला व पंच क्रमांक -1 श्री.वाघमारे यांना लाच मागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे श्री.गरुड यांना लाच रक्कम देण्यासाठी लघु पाटबंधारे उप विभाग, आष्टीकडे रवाना केले. श्री.शंकर शिंदे हे सापळा पथकासह आमचे पाठोपाठ आले. मी व पंच क्रमांक 1 श्री.वाघमारे असे लघु पाटबंधारे उप विभाग, आष्टी येथे गेलो. त्याठिकाणी श्री.गरुड हे बाहेर जाताना दिसले. त्यामुळे मी व पंच क्रमांक 1 कार्यालयामध्ये थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने श्री.गरुड कार्यालयामध्ये आले. श्री.गरुड व कार्यालयातील इतर व्यक्ती बरोबर त्यांची चर्चा झाली. त्यानंतर श्री.गरुड यांना मी चेकची मागणी केली त्यावेळी त्यांनी मला पैसे आणलेत का ? अशी विचारणा करुन हिशोब करुन दाखवला. त्यावेळी मी त्यांना पैसे आणले आहेत असे म्हणाल्यावर त्यांनी चेक माझ्यासमोर टेबलवर ठेवला. त्यावेळी मी माझे पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशातुन उजवे हाताने लाच रक्कम 3880/- रुपये बाहेर काढुन श्री.गरुड यांचेसमोर धरली असता, त्यांनी लाच रक्कम 3880/-रुपये उजवे हाताने स्विकारुन दोन्ही हातांनी मोजुन त्यांनी अंगावर परिधान केलेल्या शर्टच्या समोरील डावे बाजुचे खिशात ठेवले. मी श्री.गरुड यांना श्री.गायकवाड यांना फोन करण्यास सांगीतला असता, त्यांनी नंतर सांगतो असे म्हणुन श्री.गायकवाड यांना फोन केला नाही. त्यानंतर मी चेक घेऊन कार्यालयाचे बाहेर येवुन मला लाच स्विकृतीनंतर करावयाचा नेमुन दिलेला पुर्वनियोजीत इशारा 15.25 वा. केला
इशारा प्राप्त होताच श्री.शंकर शिंदे हे पंच क्रमांक-2 श्री.ढेपे व सापळा पथकासह आमचेजवळ आले. माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतला. श्री.शंकर शिंदे यांनी श्री.गरुड यांना स्वत:चा, पंचांचा व सापळा पथकाचा परिचय करुन दिला. त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी पंच क्रमांक 1 श्री.वाघमारे यांना पंच क्रमांक 2 श्री.ढेपे यांचेसमक्ष विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझ्याकडुन कोणी लाच रक्कम स्विकारली. तेव्हा पंच क्रमांक 1 श्री.वाघमारे यांनी सांगीतले की, समोर खुर्चीवर बसलेल्या इसमाकडे बोट करुन हेच ते श्री.गरुड साहेब असुन त्यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करुन स्वत: लाच रक्कम स्विकारुन दोन्ही हातांनी मोजुन त्यांनी अंगावर परिधान केलेल्या शर्टच्या डावे बाजुचे खिशात ठेवली आहे असा खुलासा पंच क्रमांक 1 श्री.वाघमारे यांनी केला त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी श्री.गरुड यांना लाच रकमेबाबत विचारणा केली असता, श्री.गरुड यांनी सदरची लाच रक्कम ही त्यांचे अंगावरील शर्टचे समोरील डावे बाजुचे खिशात ठेवली असल्याचे सांगीतले. त्यावर श्री.गरुड यांचेकडील लाच रक्कम 3880/-रुपये पंच क्रमांक -2 श्री.ढेपे यांना ताब्यात घेण्यास सांगीतले. त्यावर पंच क्रमांक 2 श्री.ढेपे यांनी श्री.गरुड यांचे शर्टचे समोरील डावे बाजुचे खिशातुन लाच रक्कम 3880/-रुपये बाहेर काढुन नोटांची वर्णन व क्रमांकाची खात्री केली असता, सदर नोटांचे क्रमांक व वर्णन हे सापळा पुर्व कारवाईमधील नमुद नोटांचे वर्णन व क्रमांक एकच असुन तंतोतंत मिळुन येत असल्याचे सांगीतले. त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी श्री.गरुड यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव पोपट श्रीधर गरुड, वय-40 वर्ष, व्यवसाय-नौकरी, वरिष्ठ लिपीक, लघु पाटबंधारे उप विभाग, आष्टी रा.दादेगाव ता.आष्टी जि.बीड ह.मु.शासकीय पाटबंधारे वसाहत आष्टी ता. आष्टी जि.बीड (वर्ग-3) असे सांगीतले. त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी श्री.गायकवाड यांचे बाबत श्री.गरुड यांना विचारणा केली असता, त्यांनी त्यांचे नाव श्री.कुंदन अशोक गायकवाड, प्रथम लिपीक, उस्मानाबाद मध्यम प्रकल्प विभाग, उस्मानाबाद रा.कल्पनानगर, कळंब ता.कळंब जि.उस्मानाबाद (वर्ग-3) असे असल्याचे सांगुन ते सध्या कोठे आहेत याबाबत त्यांना माहित नसल्याचे सांगीतले. त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी मला श्री.गरुड यांनी दिलेल्या चेक ताब्यात घेऊन घटनास्थळावर प्राथमीक कार्यवाही केली. त्यानंतर श्री.शंकर शिंदे, मी, पंच, श्री.गरुड व सापळा पथकातील सदस्य लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड येथे पोहचलो. श्री.शंकर शिंदे यांनी मला श्री.गरुड यांनी दिलेल्या चेकची झेरॉक्स काढुन मुळ चेकचे वर्णन पंचनाम्यात घेऊन माझ्या ताब्यात दिला. केलेल्या कारवाईचा एकत्रीत लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा पंचनामा केला आहे.
तरी श्री.गायकवाड यांनी प्रवास भत्ता देयक मंजुर केल्याचा मोबदला तसेच मंजुर देयकाचा चेक देण्यासाठी माझ्याकडे 2000/-रुपये लाचेची मागणी केली तसेच श्री.गरुड यांनी प्रवास भत्ता मंजुर देयक 19410/-रुपयाचे 20 टक्के प्रमाणे 3882/-रुपये लाचेची श्री.गायकवाड यांचेसाठी व स्वत:साठी मागणी करुन लाच रक्कम स्वत: स्विकारण्याचे मान्य करुन दिनांक 24/04/2023 रोजी 15.25 वा. लघु पाटबंधारे उप विभाग, आष्टी येथे लाच रक्कम 3880/-रुपये पंचासमक्ष स्विकारली असता, श्री.गरुड यांना लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले आहे. म्हणुन माझी 1) श्री.कुंदन अशोक गायकवाड, प्रथम लिपीक, उस्मानाबाद मध्यम प्रकल्प विभाग, उस्मानाबाद रा.कल्पनानगर, कळंब ता.कळंब जि.उस्मानाबाद 2) पोपट श्रीधर गरुड, वय-40 वर्ष, व्यवसाय-नौकरी, वरिष्ठ लिपीक, लघु पाटबंधारे उप विभाग, आष्टी रा.दादेगाव ता.आष्टी जि.बीड ह.मु.शासकीय पाटबंधारे वसाहत आष्टी ता.आष्टी जि.बीड (दोन्ही वर्ग-3) यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
हि फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
HAMID CHAND SHAIKH
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): API
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.ठाणे अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): HEMANT POPATRAO
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI